



दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com
RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : ३०४ वा | गुरूवार दि १९ फेब्रुवारी २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# जिल्हा रुग्णालयात दारूच्या बाटल्यांचा खच

## आरोग्य यंत्रणेचा भोंगळ कारभार उघड!

### मुख्यालयातील रुग्णालयाचीच दयनीय अवस्था; ग्रामीण भागाचे काय?



**जनसंचलन/बुलढाणा**

केंद्रीय आरोग्य, आयुष व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या गृह जिल्ह्यातच आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तथा जिल्हा सामान्य रुग्णालयातील आयुष विभागाबाहेर विदेशी दारूच्या बाटल्यांचा अक्षरशः खच आढळून आला. त्यामुळे हे रुग्णालय आहे की दारुड्यांचा अड्डा? असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. गोरगरीब रुग्ण, महिला व वृद्ध मोठ्या विश्वासाने उपचारासाठी येतात; मात्र रुग्णालय परिसरातच दारूच्या बाटल्या पडलेल्या दिसत असल्याने असुरक्षिततेची भावना वाढीस लागली आहे. प्रशासनाचे या प्रकाराकडे पूर्ण दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत असून, रुग्णालयातील भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. जिल्हा मुख्यालयातील रुग्णालयाची ही अवस्था असेल, तर ग्रामीण भागातील शासकीय रुग्णालयांची स्थिती काय असेल? असा सवाल उपस्थित होत आहे. संबंधितांवर तात्काळ कारवाई करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# जिओ रेंज गायब की कटकारस्थान?

## मलकापूर पोलिस तपासात धक्कादायक उघड!



**जनसंचलन/मलकापूर**

जिल्ह्यात मागील सात ते आठ दिवसांपासून नागरिकांना रिलायन्स जिओ ची रेंज असूनही नेटवर्क सेवा ठप्प असल्याचा संतापजनक अनुभव येत होता. कॉल लागत नव्हते, इंटरनेट सेवा खंडित होती, ऑनलाईन व्यवहार अडकले होते. मात्र यामागचे खरे कारण नागरिकांना समजत नव्हते. आता मलकापूर शहर पोलिसांत दाखल झालेल्या तक्रारीमुळे धक्कादायक बाब समोर आली आहे. मलकापूर हद्दीतील बेलाड गावातील जिओ टॉवर (आयडी ---९०३२) येथील फायबर ऑप्टिक केबल अज्ञातांनी कापून मोठी तोडफोड केल्याचे उघड झाले आहे. या प्रकारामुळे संबंधित साइट पूर्णपणे बंद पडली असून कंपनीचे अंदाजे दीड ते दोन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. ही तक्रार टॉवर मेंटेनन्सचे काम पाहणाऱ्या प्रताप टेक्नोक्रॅट्स प्रायवेट लि. चे कंपनीच्या इस्टेट मॅनेजरकडून देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, पगारवाढीच्या मागणीसाठी यवतमाळ जिल्ह्यातील पुसद येथे सुरू असलेल्या संपाच्या पार्श्वभूमीवर काही संपकरी कर्मचाऱ्यांनी ड्डमागण्या पूर्ण नाही झाल्या तर टॉवर चालू देणार नाहीफ्फ अशी धमकी दिल्याचा आरोप आहे. त्यामुळे ही तोडफोड संपाशी संबंधित आहे का? असा संशय बळावत आहे. सात-आठ दिवस नागरिकांना अंधारात ठेवणाऱ्या या प्रकारामुळे आता संतापाची लाट उसळली आहे. जाणीवपूर्वक नेटवर्क ठप्प करून जिल्ह्याला डिजिटल अंधारात ढकलण्याचा हा कट होता का? असा सवाल उपस्थित होत आहे. मलकापूर शहर पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला असून दोषींवर कठोर कारवाई होणार का, याकडे संपूर्ण बुलढाणा जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# वन्य प्राण्यांचा पिकांवर डल्ला; मोहना बुद्रुक येथील शेतकरी हवालदिल!

**जनसंचलन/मेहकर**

मोहना बुद्रुक येथे वन्य प्राण्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे शेतकरी अक्षरशः मेटाकुटीला आले आहेत. डोंगरपट्ट्यालगत असलेल्या शेतजमिनींमध्ये रात्रीच्या अंधारात वन्य प्राण्यांचे टोळके शिरत असून उभ्या पिकांचा अक्षरशः फडशा पाडला जात आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावला जात असल्याची संतप्त भावना परिसरात व्यक्त होत आहे. येथील शेतकरी मोहन चव्हाण यांच्या गट क्रमांक २०२ व २०३ मधील पाच एकर क्षेत्रात यंदा मोठ्या अपेक्षेने हरभरा पेरण्यात आला होता. मात्र, त्यापैकी तब्बल दोन ते अडीच एकर क्षेत्रातील उभे पीक वन्य प्राण्यांनी पूर्णपणे फस्त केले. काढणीच्या तोंडावर आलेल्या हरभऱ्याचे झालेले नुकसान पाहून चव्हाण कुटुंबीय हवालदिल झाले आहेत. विशेष म्हणजे, पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेताभोवती ड्डझटका मशीनफ अर्थात सौर कुंपण बसवण्यात आले होते. तरीदेखील वन्य प्राण्यांनी या संरक्षण व्यवस्थेला न जुमानता शेतात घुसखोरी केली. यापूर्वी तुरीचे पीकही अशाच प्रकारे बाधित झाल्याने ते मोडून हरभरा पेरण्यात आला होता. आता दुसरे पीकही हातातून गेल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. इतका खर्च करूनही पीक वाचत नसेल तर शेती करायची कशी? आम्ही जगायचे कसे? असा संतप्त सवाल पीडित शेतकरी मोहन चव्हाण यांनी केला आहे. या गंभीर प्रकाराकडे वन विभागाने तातडीने लक्ष देऊन नुकसानग्रस्त क्षेत्राचा पंचनामा करावा, तात्काळ नुकसानभरपाई जाहीर करावी आणि डोंगरपट्ट्यात कायमस्वरूपी उपाययोजना राबवाव्यात, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. अन्यथा शेतकरी रस्त्यावर उतरतील, असा इशाराही देण्यात आला आहे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# वासरा जपणारं घरकुल



असं विठ्ठल कामत सांगतात. मरिन लाइन्सला समुद्राला लागूनच असलेल्या सेंट जेम्स कोर्ट या हेरिटेज इमारतीत चौथ्या मजल्यावरील त्यांच्या प्रशस्त घरात या त्रिसूत्रीचा पावलोपावली प्रत्यय येतो. हे केवळ एक घर नसून, छोटेखानी वस्तुसंग्रहालयच आहे. वारशाचं इथं अतिशय मनोभावे जतन करण्यात आलंय. उजवीकडं क्वीन्स नेकलेस, डाव्या बाजूला अगदी खेटून असलेलं ब्रेबॉन स्टेडिअम , समोर एअर इंडियाच्या इमारतीपर्यंतच्या मुंबईचं दर्शन, तर मागील बाजूस नजरेच्या टप्प्यात येणारा वरळीपर्यंतचा परिसर... असं चौरंगी दर्शन घडवणारं सुमारे चार हजार चौरस फुटांचं हे प्रशस्त घर. त्यामध्ये प्रवेश करताच उजव्या भिंतीवरील नृत्याविष्कारातील गणरायाच्या दर्शनानं या लघुसंग्रहाच्या सफारीचा शुभारंभ होतो. अगदी समोरच असलेलं रंगीत नक्षीनं नटलेलं तावदान ही वास्तू ऐतिहासिक, अनोखी असल्याची साक्ष देतं. डावीकडं वळलं की, प्रशस्त दिवाणखाना. दिवाणखाना कसला वास्तूसंग्रहालयातील एक दालनच ते. वारसा जपणारं काय म्हणून नाहीय इथं? एका बाजूला ४० वर्षं जुनं टेप रेकॉर्डर-सीडी प्लेअर, शेजारीच जगभरातल्या गणेशमूर्ती, समोरच्या भिंतीवर २०० ते २५० वर्षं जुनं दुर्मीळ जपानी सात्सुमा वाझे ते मधल्या टेबलाच्या आत कासवांच्या एकाहून एक देखण्या प्रतिकृती. दिवाणखान्यात आणखी एक वस्तू खास आहे, ती म्हणजे सोफा. माजी सरन्यायाधीश वाय. व्ही. चंद्रचूड यांनी तो दिलेला. लहान असताना याच सोफ्यावर आपण खेळलो असल्याच्या आठवणीला कामत उजळा देतात. दिवाणखान्याच्या उजव्या बाजूला समोर पहिली बेडरूम. यात तीन गोष्टी खास आहेत. एक म्हणजे भारताचे पहिले बॅरोनेट सर जमसेटजी जेजीभॉय यांनी दिलेलं २५० वर्षं जुनं स्टडी टेबल व खुर्ची, सुमारे १०५ वर्षं जुना व चार पिढ्यांनी वापरलेला पलंग आणि जवळपास तितकंच जुनं सुंदर नक्षीकाम असलेलं लाकडी कपाट. दिवाणखान्याच्या डाव्या बाजूला दुसरी बेडरूम. यातही बेहराम कॉण्ट्रॅक्टर यांनी दिलेल्या ८० ते ९० वर्षं जुन्या हॅट स्टँडसह अनेक दिग्गजांनी दिलेल्या अनोख्या वस्तूंचा भरणा आहे. जुनी लोखंडी कपाटं, कॅसेट-सीडीजचा संच इथं जुन्या काळाच्या आठवणी ताज्या करतो. या बेडरूमला लागूनच आहे स्टडीरूम वजा आणखी एक बेडरूम. या बेडरूमच्या समोरच्या जागेतील कपाटामध्ये शेकडो पुस्तकं, शेजारीच १५० वर्षं जुनं ड्रेसिंग टेबल लक्ष वेधून घेतं. समोरच सर्व्हंट रूम आणि त्याच्या शेजारी स्वयंपाकघर. हे आलिशान घर कामत यांनी स्वतः विकत घेतलेलं नाही, तर वडिलांनी त्यांना ते १९८०मध्ये ङ्गगिफ्टफ केलं होतं. वास्तू वडिलांनी दिली असली तरी त्यातील प्रत्येक वस्तू मात्र कामत यांनी आणली, जोपासली. या घराचं ठळक वैशिष्ट्य म्हणजे यात एकही नवीन वस्तू नाही. जवळपास प्रत्येक वस्तू कोणी तरी फेकून देण्यासाठी काढलेली किंवा भेट दिलेली. या वस्तूंच्या रूपानं देणाऱ्याच्या पालकांचा, त्यांच्या आजी-आजोबांचा वारसा, आठवणी आणि आशीर्वाद माझ्या घरात असल्याचं आत्मीयतेनं सांगतात. जगभरातील उत्तमोत्तर हजारो गणपती, कासवांच्या किमती प्रतिकृती, शेकडो लड्डू गोपाल, पेंटिंग, अनोखे कंगवे, कांस्याच्या वट्की, देशातल्या विविध प्रदेशांतील राण्यांच्या दिवट्या, विविध प्रकारचे सिगार पाइप त्यांच्या घरात संग्रही आहेत. कोणतीही वस्तू घरात आणणं तसं सोपं असतं, पण त्याची जपणूक करणं तुलनेनं अवघड. कामत यांच्या या मौलिक गृहसंग्रहाच्या जतनात पत्नी विद्या कामत यांचा मोलाचा वाटा असल्याचं ते आवर्जून नमूद करतात. कामत कुटुंब ३५ वर्षांहून अधिक काळ इथं राहतात. त्यांची मुलंही या दुर्मीळ वस्तूंची साफसफाई करायची, अशी आठवण विद्या सांगतात. घरात कामत यांचे दोन हळवे कोपरे आहेत. एक दिवाणखान्यातील खिडकी, जिथून समुद्र सुस्पष्ट दिसतो. या खिडकीत विद्या यांच्या वडिलांच्या हॉटेलमधलं ७९ वर्षं जुनं बाकडं आहे. दुसरा कोपरा म्हणजे पहिल्या बेडरूममधील खिडकी. इथून ब्रेबॉनवरचे क्रिकेट सामने सहज दिसतात. अगदी राजाभाई टॉवरच्या घड्याळापर्यंतचं दर्शन इथून होतं. ङ्गब्रेबॉन स्टेडिअम आणि मी जुळे भाऊ आहोतफ, असं कामत गंमतीनं म्हणतात. जगभरातील ६००हून जास्त हॉटेलांचं रूपडं पालटणाऱ्या कामत यांच्यासाठी या घराचा कायापालट करणं म्हणजे, ङ्गअगदी मनात विचार आला आणि तत्क्षणी तो अमलात आणलाफ, इतकं सोपं आहे. पण या ऐतिहासिक वास्तूला त्यांनी किंचितही धक्का लावलेला नाही. एकाहून एक सरस, अत्याधुनिक किचन हाताळलेल्या कामत यांनी या स्वयंकापघरातही अजिबात बदल केलेला नाही. अगदी कित्येक वर्षं जुनं रेफ्रिजरेटरही इथून हललेलं नाही. घर आजही घेतलेल्याच स्थितीत आहे. आवश्यकता भासली तेव्हा केवळ डागडुजी आणि रंगरंगोटी केली गेली. सतत जगभर फिरत असताना हा संग्रह, वारसा कामत यांना सातत्यानं घराची ओढ लावत असतो. ङ्गआई-वडिलांकडून मिळालेला वारसा, आपली संस्कृती, आपले रीतीरिवाज आणि आपला स्वभाव ज्या वास्तूत पाऊल ठेवल्याक्षणी प्रतिबिंबित होतो, ते ठिकाण म्हणजेच घर! आपल्या कामाव्यतिरिक्तच्या व्यक्तिमत्त्वाचं दर्शन जिथं घडतं, ते असतं आपलं घरफ, असं ते नमूद करतात.





The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पण तुमच्या पाठीशी कोणी नाही असं समजू नका; सुनेत्रा पवारांची भावनिक साद

**पुणे :** 'अजितदादा दादाच होते. त्यांच्यासारखे काम आपल्याला करता येणार नसले, तरीही आपल्याला काम करायचे आहे. मी कार्यकर्त्यांच्या पाठीशी भक्कम उभी आहे. आपल्याला अजितदादांचे स्वप्न पूर्ण करायचे आहे,' अशा शब्दांत उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी विजयी उमेदवारांना भावनिक साद घातली.दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जाण्याने राष्ट्रवादी परिवारासह संपूर्ण महाराष्ट्राला मोठा धक्का बसला आहे. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची नुकतीच शपथ घेतली. त्यानंतर त्यांची पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदी वर्णी लागली. दुःखाचा डोंगर कोसळला असताना सुनेत्रा पवार यांनी पक्ष, कार्यकर्त्यांसाठी एक पाऊल पुढे टाकून आता पक्षाची धुरा हातात घेतली आहे. अजित पवार यांच्यासारखेच धडाडीने काम करण्याची जिद्द ठेवून





त्या पावले टाकू लागल्या आहेत. पुणे, बारामतीत कार्यकर्त्यांसह पदाधिकाऱ्यांच्या भेटीगाठीतून गेल्या काही दिवसांत त्यांचा अजित पवार यांच्यासारखाच काम करण्याचा प्रयत्न असल्याचे दिसून आले. सुनेत्रा पवार यांनी पुरंदर, बारामती, दौंड, इंदापूर या चार तालुक्यांतील जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या विजयी उमेदवारांसह पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी बारामतीत घेतल्या. त्या बैठकांमध्ये नवनियुक्त पदाधिकारी, विजयी उमेदवारांसह कार्यकर्त्यांची उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी ओळख करून घेतली. त्यांच्या भागातील समस्या जाणून घेतल्या. पुण्यासह बारामतीतील कार्यकर्त्यांच्या भेटीत आपण सोबत असल्याचा विश्वासही सुनेत्रा पवार यांनी दिला. 'अजितदादांच्या जाण्याने राष्ट्रवादी परिवाराने आता आपल्या पाठीशी कोणी नाही असे समजू नये. दादा ज्या पद्धतीने काम करायचे तसेच काम आपल्याला करायचे आहे,' अशा शब्दांत सुनेत्रा पवार यांनी उपस्थित राष्ट्रवादीच्या सर्व विजयी उमेदवारांसह पदाधिकाऱ्यांना विश्वास दिला. 'दादा नसले, तरी मी तुमच्यासोबत आहे. तुम्ही काळजी करू नका. पक्षवाढीसाठी जेवढी मदत करता येईल तेवढी करायला तयार आहे. तुमच्यासाठी राज्य सरकारकडूनही मदत करायला तयार आहे,' असेही सांगून त्यांनी उपस्थितांना आश्वस्त केले.गेल्या दोन दिवसांमध्ये जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या पदाधिकाऱ्यांची ओळख करून घेण्यासाठी बैठका घेण्यात आल्या. त्या बैठका म्हणजे मुलाखती असल्याचा समज कार्यकर्त्यांसह पदाधिकाऱ्यांमध्ये निर्माण झाला. मात्र, ही बैठक नवनियुक्त सदस्यांची ओळख करून घेण्यासाठीच होती, असे आता राष्ट्रवादीच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.दर शुक्रवारी दौरा केल्यानंतर अजित पवार शनिवारी, रविवारी बारामतीत असायचे. बारामतीतील विविध विकासकामांची अधिकारी, पदाधिकाऱ्यांसह जाऊन पाहणी करायचे. जे खटकले ते तोंडावर बोलून चूक सुधारायला सांगायचे. त्यांचे निधन होऊन दोन आठवडे उलटले. त्यानंतर त्यांचे पुत्र पार्थ पवार यांनी त्यांच्या संकल्पनेतील बारामतीमधील कन्हेरी येथील वन उद्यानासह इतर विकासकाम ंची पाहणी केली. त्यामुळे अजित पवार यांच्यानंतर आता पार्थ पवार हे 'अॅक्शन मोड'वर आल्याचे बोलले जात आहे.

## निलेश राणेंचा गणेश नाईकांना इशारा, महायुतीतला वाद टोकाला

**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि भाजप सत्तेत एकत्र असले तरी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची शिवसेना यांच्यात सारं काही आलबेल नसल्याचं दिसत आहे. गणेश नाईक यांच्याकडून वारंवार एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला जातोय. गणेश नाईक यांच्याकडून एकनाथ शिंदे यांच्यावर गंभीर आरोप देखील केले जात आहेत. विशेष म्हणजे गणेश नाईक हे भाजपचे ज्येष्ठ नेते आहेत, तसेच ते राज्याचे वनमंत्री आहेत. असं असताना मित्रपक्षाच्या प्रमुख नेत्यावर ते अशा प्रकारे टीका सातत्याने करत असल्याने महायुतीतल्या या वादाचा मोठा फुगा फुटणार का? असा प्रश्न आता उपस्थित होतोय. कारण याआधी एकनाथ शिंदे आणि गणेश नाईक यांच्यात शीतयुद्ध सुरु असल्याची चर्चा होती. पण आता उघडपणे आरोप-प्रत्यारोप केला जात असल्याने या शीतयुद्धाचा मोठा फुगा फुटणार का? अशी चर्चा आता राजकीय वर्तुळात होऊ लागली आहे.गणेश नाईक यांनी अप्रत्यक्षपणे एकनाथ शिंदे यांच्यावर गंभीर आरोप केले. 'नवी मुंबईकरांच्या सुविधेसाठी जे भूखंड मागितले होते ते बिल्डरांच्या घशात घातले जात आहेत. नगरविकास खात्यातील लोकांनी हे कर्म दरिद्री काम केले आहे. रुग्णालय, बाग, शाळेसाठी जे भूखंड मागितले ते भूखंड बिल्डर लोकांच्या घशात ह्यांच्या दलालांनी घातली. मला या गोष्टीची लाज वाटते की, ज्या मंत्रिमंडळात मी आहे त्या मंत्रिमंडळातील नगरविकास खात्याच्या लोकांनी अशा प्रकारचा कर्मदरिद्रीपणा केला. ज्या गोष्टीकरता गणेश नाईक लोकांकरता आमदार आणि मंत्री झाला ते मी बोलू शकलो नाही तर ते मंत्रिपद चाटायचं आहे का?', असं गणेश नाईक म्हणाले होते. त्यांच्या टीकेला खासदार श्रीकांत शिंदे यांनी प्रत्युत्तर दिलं. 'एकनाथ शिंदेंनी २०२२ मध्ये उठाव केला नसता तर मंत्रिपदही मिळालं नसतं', असं प्रत्युत्तर श्रीकांत शिंदे यांनी दिलं.यानंतर आता शिवसेनेचे आमदार निलेश राणे यांनी देखील मंत्री गणेश नाईक यांच्यावर निशाणा साधला आहे. 'वनच राहिली नाहीत तर वनमंत्री काय कामाचे?', असं निलेश राणे म्हणाले आहेत.

## विरोधी पक्षनेता परिपक्व असणे गरजेचे : रिजिजू

**नवी दिल्ली :** केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी रविवारी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर निशाणा साधला. त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर दिवंगत भाजप नेत्या सुषमा स्वराज यांचा जुना व्हिडिओ शेअर केला. त्यांनी लिहिले की, एक परिपक्व विरोधी पक्षनेता सभागृह सहजपणे चालवण्यासाठी आणि संसदीय लोकशाही सुधारण्यासाठी खूप उपयुक्त ठरतो. रिजिजू यांचे हे विधान अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात झालेल्या गोंधळानंतर आले. राहुल गांधी यांनी चिनी रणगाड्यांची लडाखमधील घुसखोरी आणि माजी लष्करप्रमुख जनरल एमएम नरवणे यांच्या पुस्तकावर विधान करण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी 'एपस्टीन फाइल्स' आणि भारत-अमेरिका व्यापार करार यांसारखे मुद्दे संसदेत मांडण्याचा प्रयत्न केला होता, ज्यांना भाजपने निराधार म्हटले होते. यानंतर अध्यक्षांनी त्यांना थांबवले. त्यानंतर विरोधी खासदारांनी सभागृहात गोंधळ घातला होता आणि सभागृहाचे कामकाज थांबवले होते.

## अजित पवारांच्या निधनादिवशीच मंत्रालयात सह्यांचा सपाटा?

**मुंबई :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राज्यभरात हळहळ व्यक्त करण्यात आली. मात्र अजित पवार यांच्या निधनाच्या दिवशीच मंत्रालयात एका खात्यात मात्र सह्यांचा सपाटा सुरू असल्याचा धक्कादायक दावा करण्यात आला आहे. राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांच्या अकाली निधनाने शासकीय दुखवटा असताना राज्याच्या अल्पसंख्यांक विभागाकडून ७५ शिक्षण संस्थांना घाईघाईत अल्पसंख्यांक दर्जा देण्यात आल्याचे सांगितले जात असून अजित पवार यांच्या अपघातानंतर काही तासांतच याबाबतची प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. एका मराठी वृत्तवाहिनीने याबाबतचे वृत्त दिल्यानंतर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी संताप व्यक्त केला आहे.अजित पवार हे हयात असताना ज्या फाईल्स पेंडिंग ठेवण्यात आल्या होत्या त्या फाईल्सवर अजित पवारांच्या निधनाच्या दिवशीच मंत्रालयात घाईघाईने सह्या करण्यात आल्याचा प्रकार समोर आल्यानंतर रोहित पवार यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. 'सर्वच बंगाळ



झालंय, माणसाची काही किंमत आहे कि नाही? थोड्या फार तर भावना, संवेदना असायला हव्यात की नाही?' असा सवाल करत रोहित पवार यांनी एक्स पोस्टमधून आपल्या भावना मांडल्या आहेत.सदर वृत्तानुसार, ऑगस्ट २०२५ पासून या शाळांच्या अल्पसंख्यांक दर्जाची प्रमाणपत्रे देण्याची प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती. परंतु अजित पवारांचे निधन होताच सदर स्थगिती डावलत मंत्रालयातून या शाळांना अल्पसंख्यांक प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात केले गेल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे पहिले प्रमाणपत्र अजित पवार यांचे निधन झाले त्याच दिवशी म्हणजेच २८ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजताच्या दरम्यान देण्यात आले.शाळांना अल्पसंख्यांक दर्जा देण्याच्या या प्रकरणात मोठा आर्थिक गैरव्यवहार झाला आहे.

## 'सुनेत्रा पवारांच्या मदतीला जाऊ पण आता विलीनीकरणाची चर्चा नको'

**मुंबई :** जयंत पाटील यांनी आमचा पक्ष सत्ताधारी राष्ट्रवादी पक्षाला कधीही मदत करण्यासाठी तयार आहे, असं म्हटलं आहे. आमच्याकडे शरद पवारांचं स्वतंत्र नेतृत्व आणि पक्षाचं स्वतंत्र अस्तित्व आहे. पण वेळ पडल्यास आम्ही कधीही सुनेत्रा पवारांच्या मदतीला धावून जाऊ, असंही त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना म्हटलं आहे. पण यामुळे मात्र शरद पवारांच्या पक्षाने आता विलीनीकरणाचा मुद्दा मागे सोडला आहे का, असा प्रश्न आता उपस्थित होतो आहे.गेल्या अनेक दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चा सुरु आहेत. पण त्यावर ठोस असा निर्णय कधी होणार हा एक मोठा प्रश्न आहे. अजित पवार ांच्या अकाली निधनानंतर अनेक दावे



करण्यात येत आहेत. त्यांची शेवटची इच्छा होती, की राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष एक झाला पाहिजे त्यासाठी चर्चाही सुरु झाल्या होत्या या सर्व चर्चा राष्ट्रवादी शपचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि स्वतः अजित पवार यांच्यामध्ये सुरु होत्या, असं शप गटाचे अनेक नेते सांगत आहेत. पण त्यानंतरही पक्षाच्या विलीनीकरणावर अजित पवार गटाचे नेते किंवा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी कोणतीही भूमिका अद्यापपर्यंततरी घेतलेली नाही.उद्या राजकारणात काय होईल हे आज सांगता येत नाही, अजित दादांच्या अशा निधनानंतर हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आजचा दिवस उद्याही आहे का, हे नियतीलाही मान्य आहे का', असं पाटील म्हणाले आहेत. पुढे बोलताना ते म्हणाले की, 'मला विलीनीकरणावर चर्चा करु वाटत नाही. आमचा पक्ष स्वतंत्र आहे. आमच्या पक्षाचे नेतृत्व शरद पवार करतात. आमचा पक्ष थांबला नाही आहे. आमच्या पक्षाची वाटचालही सुरु आहे. आमची सुनेत्रा पवार, पार्थ पवार यांच्यासमोर प्रश्न उभे करण्याची किंवा कोणत्या अडचणी आणण्याची इच्छा नाही.'त्यामुळे विलीनीकरणाच्या मुद्द्यांवर आता शरद पवार गटाकडून ठामपणे नकार देण्यात येत असल्याने राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. त्याचवेळी स्वतंत्र वाटचाल करण्याचे संकेतही मिळत असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.दरम्यान, शरद पवार गटाचे नेते जयंत पाटल यांनी राष्ट्रवादीच्या मासिकाम ध्ये नवे भाष्य केले आहे. त्यांनी दोन्ही राष्ट्रवादी पक्षांचे विलीनीकरणानंतर पक्षाचे नेतृत्व हे अजित पवार करणार होते. यासंबंधी शरद पवार आणि इतर नेत्यांमध्येही एकमत झाल्याचा खुलासा जयंत पाटील यांनी केला आहे.

# जुन्या भांडणाचा राग, पुलावर एकट्याला गाठलं; नांदेडमध्ये १६ वर्षीय मुलाला निर्घृणपणे संपवलं

**नांदेड :** जिल्ह्यात गुन्हेगारीचं प्रमाण वाढलं आहे. भाईगिरीच्या नादात अल्पवयीन मुलं गुन्हेगारीच्या वळणावर वळत आहे. नांदेडमध्ये अशीच एक धक्कादायक घटना घडली असून क्षुल्लक कारणावरून तीन अल्पवयीन आरोपींनी एका १६ वर्षीय मित्राच्या पोटात चाकू भोसकून हत्या केली. काल रविवारी गोवर्धन घाट परिसरात ही घटना घडली. भरदिवसा घडलेल्या या घटनेनं एकच खळबळ उडाली होती. दरम्यान, घटनेच्या काही तासाच्या आत पोलिसांनी तिन्ही अल्पवयीन आरोपींना ताब्यात घेतलं.मयत हा आकरावीचं शिक्षण घेत होता. तरुणाचा गल्लीतील मित्रांसोबत आठ ते १० दिवसापूर्वी वाद झाला होता. या वादातून मयत तरुणाने



मित्राला मारहाण केली होती, अशी माहिती आहे. मध्यस्तीनंतर त्यांच्यातील वाद मिटवण्यात आला, पण मारहाणीचा राग मनात धरून आरोपींनी हत्येचा कट रचला. काल रविवारी दुपारी मयत तरुण हा गोवर्धन घाट पुलाजवळ असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर तिघांनी गोवर्धन घाट पुलाजवळ त्याला गाठलं आणि त्याच्यावर चाकूने जबर हल्ला केला. या चाकू हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला. जखमी अवस्थेत त्याला स्कुटीवर कौठा भागातील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं होतं. रक्तस्त्राव झाल्यानं त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.घटनेनंतर आरोपी फरार झाले. स्थानिक गुन्हे शाखेने तिन्ही आरोपींना नरसी नायगावमार्गे पळून जात असताना ताब्यात घेतलं. विशेष म्हणजे तिन्ही आरोपी अल्पवयीन आहेत. मयताच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून वजीराबाद पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.रेड्याची टक्कर पाहण्यासाठी गेलेल्या एका तरुणाचा मृत्यू झाला. कंधार तालुक्यातील आलेगांव इथल्या उत्साही मंडळींनी काल रविवारी रेड्यांच्या टक्करीचे आयोजन केलं होतं. यावेळी रेड्याची शेवटची टक्कर सुरू असताना एका मुलाला रेड्याने जोरदार धडक दिली. या धडकेत खंडू झम्पलवाड या बाचोटी इथल्या मुलाचा मृत्यू झालाय. खंडू हा आता लवकरच सुरू होणाऱ्या दहावीच्या परीक्षेला बसणार होता. त्याच्या या मृत्युमुळे बाचोटी गावावर शोककळा पसरली आहे. या घटनेप्रकरणी उस्माननगर पोलिसांनी नोंद घेतली असून गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरू आहे.

## शिक्षकाचा इंजिनियरिंगच्या विद्यार्थिनींना अश्लील मेसेज, शिकवताना चुकीचा स्पर्श

### बारामतीतील कॉलेजमध्ये संतापजनक घटना..

**बारामती :** बारामती तालुक्यातील माळेगाव येथील एका डिप्लोमा इंजिनियरिंग महाविद्यालयातील धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सदर महाविद्यालयातील एका प्राध्यापकावर अल्पवयीन विद्यार्थिनींचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून पालकवर्गात संताप आणि चिंतेचं वातावरण निर्माण झालं आहे. नितीन शंकर तावरे (वय ४२, रा. सांगवी ता. बारामती) असे आरोपी प्राध्यापकाचे नाव असून त्यांच्याविरुद्ध प्राचार्य संदीप रमेश शहा यांनी फिर्याद दिली आहे.याप्रकरणी दाखल करण्यात आलेल्या तक्रारीनुसार, नितीन शंकर तावरे या प्राध्यापकाने प्रथम वर्षातील अल्पवयीन विद्यार्थिनींना त्यांच्या इच्छेविरुद्ध व्हॉट्सॲपवर अश्लील संदेश पाठवले. संदेशांना प्रतिसाद न दिल्यास अंतर्गत मूल्यमापनातील ३० गुण न देण्याची धमकी देण्यात येत असल्याचेही नमूद करण्यात आलं होतं. तसेच वर्गात शिकवताना विद्यार्थिनींना अयोग्य स्पर्श करणे, जवळ जाण्याचा प्रयत्न करणे आणि विरोध केल्यास वर्गात अपमानास्पद वर्तन करणे असे प्रकार या नराधम शिक्षकाने



२२ जानेवारी ते १२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत केल्याचे तक्रारीत म्हटलं आहे.व्हॅलेंटाईन वीकमध्ये गुलाब, टेडी, चॉकलेट देणे आणि सूचक वक्तव्य करणे, असे प्रकारही नितीन तावरे या शिक्षाने केल्याचं आता समोर आलं आहेत.बारामतीतील महाविद्यालयातील हा धक्कादायक प्रकार उघड झाल्यानंतर पीडित विद्यार्थिनी आणि त्यांच्या पालकांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन घडलेला प्रकार मांडला होता. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन संस्थेला तात्काळ तक्रार दाखल करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे समजते. त्यानंतर पोलिसांनी पोक्सोसह इतर कलमान्वये आरोपी शिक्षकावर गुन्हा नोंदवला असून पुढील तपास उपनिरीक्षक देविदास साळवे हे करत आहेत.

## मित्रांनी मुलाचं प्रेत बापाच्या हवाली केलं

**बीड :** बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील साळेगाव येथील राहणारा आणि औषध विक्रेता असलेला एक तरुण मित्रांसोबत धाराशिव जिल्ह्यातील एका कला केंद्रावर गेला. कला केंद्रावर जाण्यापूर्वी रस्त्यात ते सर्वजण दारू प्यायले. त्यानंतर कला केंद्रावरून परत येत असताना मध्यरात्री त्याच्या छातीत आणि पोटात लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्यात त्याचा जीव गेल्यानंतर प्रेत त्याच गाडीतून घरी आणून टाकले असल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेने परिसरात चांगलीच खळबळ उडाली आहे. मयत तरुणाच्या वडिलांच्या फिर्यादीवरून त्याच्या पाच मित्रांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल झाला आहे.मिळालेल्या अधिकच्या माहितीनुसार, बीड जिल्ह्यातील साळेगाव तालुका केज येथील महाराष्ट्र मेडिकलचे औषध विक्रेते सतीश भागवतराव मुंडे वय (३७ वर्ष) हा १२ फेब्रुवारी रोजी त्याच्या मित्रांसोबत धाराशिव जिल्ह्यातील चोराखळी येथे महाकाली कला केंद्रावर नर्तिकींचे नाच-गाणे पाहण्यासाठी शेख अजमोद्दीन ऊर्फ मुन्ना शेख जिलानी याच्या स्विफ्ट डिझायर कार मधून गेले होते. कला केंद्राकडे जात असताना त्यांनी साळेगाव येथील बारमध्ये दारू पिली. नंतर कळंब आणि येरमाळा येथील एका धाब्यावर पुन्हा दारू पिले.

## विद्यार्थ्याने रूममध्ये मृत्यूला कवटाळलं; शेवटच्या चिठ्ठीत खळबळजनक मजकूर


**जळगाव :** जळगाव शहरातील देवकर कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये द्वितीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याने प्राचार्यांनी सर्वांसमोर मारहाण केल्यामुळे नैराश्यातून राहत्या खोलीत गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली आहे. काल रविवारी (दि.१६) ही घटना घडली. त्याच्या खिशात सापडलेल्या 'सुसाईड नोट'मध्ये प्राचार्यांनी मारहाण केल्याने आत्महत्या करत असल्याचं म्हटलं आहे. श्याम प्रभाकर पाटील ( वय १९ रा. बोदवड) असं मृत विद्यार्थ्याचं नाव आहे. याप्रकरणी मृत विद्यार्थ्याच्या वडिलांनी पोलिसात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी प्राचार्यांविरोधात फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.जळगाव जिल्ह्यातील बोदवड येथील शेतकरी कुटुंबातील श्याम पाटील जळगावात देवकर कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये द्वितीय वर्षात राहून शिक्षण घेत होता. तो जळगावात भाड्याने खोली घेऊन राहत होता. रविवारी त्याचे रुममेट मित्र गावाला गेले असल्याने तो खोलीवर एकटाच होता. संध्याकाळी ६ वाजेच्या सुमारास त्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. सुसाईड नोटमध्ये त्याने आपल्या मृत्यूला महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश पवार यांना



जबाबदार धरले आहे.श्यामने मृत्यूपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत म्हटलं आहे की, 'माझी कोणतीही चुकी नसताना प्राचार्यांनी मला सर्व शिक्षक स्टाफ आणि मित्रांसमोर अपमानित करून मारहाण केली. मित्रांच्या भांडणात मध्यस्थी करायला गेलो असताना, समोरचा मुलगा मुले घेऊन आला तरी प्राचार्यांनी त्याला काहीच म्हटले नाही. उलट मलाच पीव्हीसी पाईपने मारले आणि शिवीगाळ केली. गुरु मारतात हे माहीत आहे, पण इतके नाही मारत.' पत्राच्या शेवटी त्याने आपल्या मित्राला उद्देशून, रामू, मी गेल्यानंतर माझी स्टोरी इन्स्टावर टाक, अशी भावपूर्ण विनंती देखील केली आहे.या घटनेची माहिती मिळताच जळगाव शासकीय रुग्णालयात नातेवाईकांनी मोठी गर्दी केली. जोपर्यंत प्राचार्य योगेश पवार आणि संबंधित दोषींवर गुन्हा दाखल होऊन त्यांना अटक होत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी ठाम भूमिका श्यामच्या पालकांनी घेतला होता.याप्रकरणी मृत विद्यार्थ्याचे वडिल प्रभाकर पाटील यांनी त्यांचा मुलगा श्याम यांस प्राचार्य योगेश पवार यांनी मारहाण केल्याने त्याने आत्महत्या केल्याचा उल्लेख करुन त्यांच्याविरोधात पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# व्हॅलेंटाईन डेला शिक्षकाचं नववीतल्या मुलीसोबत भयानक कृत्य

**सातारा :** साताऱ्यातून एक धक्कादाय घटना समोर आली आहे. नुकताच प्रेमदिवस म्हणजे व्हॅलेंडाईन डे पार पडला. या व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी शाळेमधील एका शिक्षकाने संताप आणणारा प्रकार केला आहे. शिक्षकाने त्याच्या विद्यार्थीनीलाच प्रपोज केलं आहे. या प्रकारामुळे एकच खळबळ उडाली आहे. मलकापूरातल्या एका शाळेमध्ये हा प्रकार घडला आहेय या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. सध्या याप्रकरणाचा सखोल तपासही पोलिसांनी सुरु केला आहे. या शिक्षकाने मुलीच्या हाताला पकडले आणि तिला प्रपोज केलं, असं मुलीच्या पालकांनी शिक्षकाविरोधात दिलेल्या तक्रारीत नमूद केलं आहे. कराड पोलिसांनी या शिक्षकाच्या विरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल केला आहे.याप्रकरणी घडलं असं की,



कराड तालुक्यातल्या मलकापूर शहरात व्हॅलेंटाईन डेला हा प्रकार घडला आहे.

या घटनेनंतर सर्व जिल्ह्यात मोठी चर्चा रंगली आहे. नववी या वर्गमध्ये शिकणारी विद्यार्थीनी आहे. तिला एका शिक्षकाने शाळेमध्ये प्रपोज करत तिचा विनयभंग केला आहे. याप्रकरणी पीडितेच्या फिर्यादीची नोंद करण्यात आली आहे. कराड शहर पोलिसांत संबंधित शिक्षकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनंतर पालकांमध्ये चिंतेचं वातावरण आहे.पोलिसांनी यावेळी माहिती दिली की, मलकापूर शहरातील एका शाळेत पीडित मुलगी नववीच्या वर्गात शिक्षण घेत आहे.

१४ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास संबंधित शिक्षकाने विद्यार्थीनीला वर्गाबाहेर बोलवले. त्यानंतर मुलीला भीती वाटत होती. या भीतीपोटी मुलगी तीन मैत्रिणींना सोबत घेऊन वर्गाबाहेर पोहोचली जिथे हा नराधम शिक्षक वाट पाहत होता. यावेळी शिक्षकाने इतर तिघींना वर्गात पाठवून पीडित मुलीला एकटीला तिथे थांबण्यास सांगितले.त्यानंतर हा शिक्षक या विद्यार्थिनीला म्हणाला की, मी तुला चार दिवस बोलवत होतो, तू का आली नाहीस? रात्री तीन वाजता व्हॉट्सॲपवर ऑनलाईन का असतेस तू? मी तुझ्यावर प्रेम करतो, असे तिच्या हातांना धरून बोलला.दरम्यान, शिक्षकाच्या शाळेतल्या अशा कृतीने पीडित मुलगी प्रचंड घाबरुन गेली. तिची भंबेरी उडाली. तिने शिक्षकाचे हात झटकले आणि वर्गाच्या दिशेने धाव घेतली. संबंधित घडलेला प्रकार तिने आपल्या वर्ग मैत्रिणींना सांगितली. लगोलग सदरील प्रकार आई- वडिलांच्याही कानावर घातला.हे सर्व ऐकल्यावर विद्यार्थीनीच्या कुटुंबियांची तळपायाची आग मस्तकात गेली, पण त्यांनी पोलिस ठाण्यात जात संबंधित शिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# श्रीलंकेचा कांगारुंना दे धक्का, स्पर्धेतून बाहेर पडण्याच्या मार्गावर

## लंकेचा ८ गडी राखून दणदणीत विजय; सामनावीर निसंकाचे नाबाद शतक

**कोलंबो/वृत्तसंस्था :** सामनावीर पथुम निसंकाची नाबाद शतकी खेळी आणि कुसल मेंडिसच्या अर्धशतकाच्या जोरावर श्रीलंकन संघाने ऑस्ट्रेलियाला पराभूत करत सुपर ८ मधील आपले स्थान पक्के केले आहे. या पराभवासह ऑस्ट्रेलियन संघाचा स्पर्धेतील प्रवास संपण्याच्या मार्गावर आला आहे. आता, झिम्बाब्वे वि आयर्लंड लढतीवर कांगारुंची नजर असणार आहे.

प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने २० षटकांत १८१ धावा केल्या. यानंतर १८२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेला दुसऱ्याच षटकात कुसल परेराच्या रुपाने धक्का बसला. यानंतर निसंका आणि कुसल मेंडिस या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी ९७ धावांची भागीदारी रचली. मेंडिस ३८ चेंडूत ६ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ५१ धावा करून माघारी फिरला. ही विकेट पडल्यावर ऑस्ट्रेलियन संघ कमबॅक करेल, असे वाटत होते. पण



पवन रत्नायकेने निसंकाला उत्तम साथ दिली. पथुम निसंकाने ५२ चेंडूत १० चौकार आणि ५ षटकारांच्या मदतीने नाबाद १०० धावा केल्या. यंदाच्या हंगामातील हे पहिले शतक ठरले. या जोरावर श्रीलंकेने ८ विकेट्स आणि २ षटके राखून ऑस्ट्रेलियाचा मानहानिकारक पराभव केला.

या सामन्यात श्रीलंकेने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि ऑस्ट्रेलियाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. ऑस्ट्रेलियाच्या मिचेल मार्श आणि ट्रॅव्हिस हेड या सलामी जोडीने ८.२ षटकांत १०० धावा केल्या. ऑस्ट्रेलिया २०० चा आकडा सहज पार करेल असे

### संक्षिप्त धावफलक

■ **ऑस्ट्रेलिया :** २० षटकांत सर्वबाद १८१ (मिचेल मार्श ५४, हेड ५६, इंग्लिस २७, मॅक्सवेल २२, दुशान हेमंता ३ बळी, दुष्मंता चमीरा २ बळी)

■ **श्रीलंका :** १८ षटकांत २ बाद १८४ (निसंका ५२ चेंडूत नाबाद १००, कुसल मेंडिस ५१, रत्नायके २८, स्टोइनिस ४६ धावांत २ बळी).

वाटत होते. पण ही जोडी फुटल्यानंतर संपूर्ण संघ १८१ धावांतच गारद झाला. ट्रॅव्हिस हेडने ५६ आणि मिचेल मार्शने ५४ धावा केल्या. तसेच, इंग्लिस आणि मॅक्सवेलने मधल्या फळीत भागीदारी करून संघाला १५० धावांच्या पुढे पोहोचवले. इंग्लिस २७ धावांवर बाद झाला, तर मॅक्सवेल २२ धावांवर माघारी गेला. इतर फलंदाज मात्र लंकन गोलंदाजांसमोर फार वेळ टिकले नाहीत आणि १८१ धावांत त्यांचा डाव आटोपला. दुशान हेमंताने ३७ धावांत ३, दुश्मंता चमीराने ३६ धावांत २ बळी मिळिवले.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या विजयासह श्रीलंकेच्या संघाने स्पर्धेतील सलग तिसऱ्या विजयासह सुपर ८ मध्ये प्रवेश केला. या निकालानंतर झिम्बाब्वेचा पुढचा पेपर सोपा झाला आहे. याउलट ऑस्ट्रेलियन संघ आता स्पर्धेत फक्त जर-तरच्या समीकरणावर टिकून आहे. 'ब' गटात श्रीलंकेशिवाय झिम्बाब्वेने सलग दोन सामने जिंकले असून गुणतालिकेत ते ४ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहेत. आयर्लंड आणि श्रीलंका यांच्याविरुद्ध उर्वरित दोन सामन्यापैकी झिम्बाब्वेला एक सामना जिंकून सुपर ८ चे तिकीट मिळिवता येईल. याउलट ऑस्ट्रेलियाला ओमानविरुद्ध मोठ्या विजयासह विजय मिळवावा लागेल आणि त्याचवेळी झिम्बाब्वे दोन्ही सामन्यात पराभूत होण्याची आशा त्यांना करावी लागेल.

# इंग्लंडचा सुपर-८ फेरीत प्रवेश



**कोलकाता/वृत्तसंस्था :** सामनावीर विल जॅक्सच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर सोमवारी येथे खेळिवण्यात आलेल्या टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या क गटातील सामन्यात इंग्लंडने इटलीचा २४ धावांनी पराभव करत सुपर-८ फेरीतील आपले स्थान निश्चित केले आहे. आता या गटातून विंडीज आणि इंग्लंड या दोन संघांनी सुपर-८ फेरीमध्ये प्रवेश मिळिवला आहे.

सोमवारच्या सामन्यात विल जॅक्सने २२ चेंडूत ४ षटकार आणि ३ चौकारांसह नाबाद ५३ धावा झोडपल्या. त्याचे हे वर्ल्ड कपमधील पहिले अर्धशतक आहे तर गोलंदाजीत त्याने ३४ धावांत १ गडी बाद केला. या सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या फलंदाजांनी हा निर्णय सार्थ ठरविताना २० षटकांत ७ बाद २०२ धावा जमविल्या. या स्पर्धेतील त्यांची ही पहिली द्विशतकी धावसंख्या आहे. त्यानंतर झुंजार प्रयत्न करणाऱ्या इटलीचा डाव २० षटकांत १७८ धावांत आटोपला.

इंग्लंडच्या डावामध्ये सलामीच्या सॉल्टने १५ चेंडूत २ षटकार आणि २ चौकारांसह २८, बटलरने ३, बेथेलने २० चेंडूत १ षटकार आणि २ चौकारांसह २३, बॅन्टनने २१ चेंडूत १ षटकार आणि ३ चौकारांसह ३०, कर्णधार ब्रुकने ९ चेंडूत १ षटकार आणि १ चौकारासह १४, सॅम करनने १९ चेंडूत २ षटकारांसह २५ धावा केल्या. विल जॅक्सने केवळ २२ चेंडूत ४ षटकार आणि ३ चौकारांसह नाबाद ५३ धावा झळकविल्याने इंग्लंडला २०० धावांचा टप्पा ओलांडता आला. ओव्हरटनने ९ चेंडूत १ षटकार आणि १ चौकारासह १५ धावा केल्या. इंग्लंडने पॉवरप्ले दरम्यानच्या ६ षटकांत ५६ धावा जमविताना २ गडी गमविले. सॅम करन आणि जॅक्स यांनी सहाव्या गड्यासाठी ६४ धावांची भागिदारी केली. इंग्लंडच्या डावात १२ षटकार १२ चौकार नोंदविले गेले. इटलीतर्फे स्टिवर्ट आणि कालुगमगे यांनी प्रत्येकी २ तर स्मुट्स, अलिहसन व बेन मॅनेंटी यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला. इंग्लंडचे द्विशतक ११९ चेंडूत नोंदविले गेले. जॅक्सने २१ चेंडूत ४ षटकार आणि ३ चौकारांसह अर्धशतक पूर्ण केले.

प्रत्युत्तरादाखल खेळताना इंग्लंडच्या शिस्तबद्ध गोलंदाजीसमोर इटलीचा डाव २० षटकांत १७८ धावांवर आटोपला. इटली संघातील बेन मॅनेंटीने २५ चेंडूत ६ षटकार आणि ४ चौकारांसह ६० धावा झोडपल्या.

# अफगाणिस्तानचा वर्ल्डकपमधील पहिला विजय

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सोमवारी अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या सामन्यात अफगाणिस्तानने वर्ल्डकपमधील पहिला विजय मिळवला. अफगाण संघाने शानदार कामगिरी करताना युएईवर ५ गडी राखून मात केली. प्रथम फलंदाजी करताना युएई संघाने २० षटकांत ९ बाद १६० धावा केल्या. यानंतर अफगाण संघाने शेवटच्या षटकात विजयाला गवसणी घातली. अझमतुल्लाह उमरझाईने अष्टपैलू कामगिरी केली. त्याने ४ विकेट्स घेतल्या आणि २१ चेंडूत नाबाद ४० धावा केल्या. त्याला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले.

अफगाणिस्तानने या सामन्यात नाणेफकीचा कौल जिंकला आणि प्रथम गोलंदाजी स्वीकारली. युएईच्या वाटेला



प्रथम फलंदाजी आली आणि त्यांनी २० षटकात ९ गडी गमवून १६० धावा केल्या. युएईकडून सोहेब खानने ४८ चेंडूत सर्वाधिक ६८ धावा केल्या. याशिवाय, आलिशान शराफूने ४० तर सईद हैदरने १३ धावांचे योगदान दिले. इतर फलंदाजांना मात्र अपेक्षित कामगिरी करता आली नाही.

दरम्यान, युएईने विजयासाठी दिलेले १६१ धावांचे आव्हान गाठताना अफगाणिस्तानला शेवटच्या षटकापर्यंत संघर्ष करावा लागला. शेवटच्या षटकात अफगाणिस्तानच्या हाती ५ विकेट होत्या. तसेच ४ धावांची आवश्यकता होती. पहिल्या दोन चेंडूतच हे आव्हान पूर्ण केले. यासह त्यांनी या स्पर्धेतील विजयाची पहिली चव चाखली. अफगाणिस्तानकडून इब्राहिम झद्रनने सर्वाधिक ५३ धावा केल्या. अझमतुल्ला उमरझाईने नाबाद ४०, दरविश रसूलीने ३३, सेदिकुल्ला अटल १६ आणि गुलबदीन नायबने १३ धावा केल्या.

# उत्तराखंडविरुद्ध कर्नाटकाचा ६८९ धावांचा डोंगर

## देवदत्त पडिकलचे द्विशतक, राहुल, रविचंद्रन स्मरण यांची शतके

**लखनौ/वृत्तसंस्था :** रणजी क्रिकेट स्पर्धेतील येथे सुरू असलेल्या पहिल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात उत्तराखंडविरुद्ध खेळताना कर्नाटकाने पहिल्या डावात ६ बाद ६८९ धावांचा डोंगर उभा केला. कर्नाटक संघाचा कर्णधार देवदत्त पडिक्कलने द्विशतक (२३२) तर केएल राहुल (१४१) व रविचंद्रन स्मरण (नाबाद १२१) यांनी दमदार शतके झळकविली.

या सामन्यात कर्नाटकांची फलंदाजी चांगलीच बहरली. त्यांती खेळाच्या पहिल्या दिवसाअखेर २ बाद ३५५ धावा जमविल्या होत्या. त्यानंतर कर्नाटकाने सोमवारी दुसऱ्या दिवशी आणखी ३३४ धावांची भर घालताना ४ गडी गमविले. केएल राहुल आणि देवदत्त पडिक्कल यांनी दुसऱ्या गड्यासाठी २७८ धावांची द्विशतकी भागिदारी केली. पडिक्कल आणि करुण नायर या जोडीने आपल्या संघाला अधिक मजबूत स्थितीत नेताना तिसऱ्या गड्यासाठी १२९ धावांची भर घातली. करुण नायरने १०५ चेंडूत १ षटकार आणि ८ चौकारांसह ६० धावा जमविल्या. पडिक्कलने १४८ या धावसंख्येवरुन खेळाला पुढे सुरूवात केली आणि त्याने आपले द्विशतक २८८ चेंडूत २ षटकार आणि २५ चौकारांच्या मदतीने झळकविले. तो चौथ्या गड्याच्या रुपात बाद झाला. पडिक्कलने ३३० चेंडूत ३ षटकार आणि २९ चौकारांसह २३२ धावा झळकविल्या. श्रेयस गोपाल खाते उघडण्यापूर्वीच त्रिफळाचीत झाला. उपाहारावेळी कर्नाटकाने पहिल्या डावात ५ बाद ५०२ धावांपर्यंत मजल मारली होती.

खेळाच्या दुसऱ्या सत्राला प्रारंभ झाल्यानंतर स्मरण आणि कृतिक कृष्णा यांनी सहाव्या गड्यासाठी १२३ धावांची शतकी भागिदारी केली. कृष्णाने १०३ चेंडूत १ षटकार आणि ६ चौकारांसह ६० धावा जमविल्या. चहापानावेळी कर्नाटकाची स्थिती १५७ षटकांत ६ बाद ६३१ अशी होती.

खेळाच्या शेवटच्या सत्रात स्मरणने आपले शतक १५० चेंडूत १ चौकारांच्या मदतीने पूर्ण केले. तसेच स्मरण आणि विद्याधर पाटील यांनी सातव्या गड्यासाठी अभेद्य ८१ धावांची भागिदारी केली. दिवसअखेर स्मरण ११ चौकारांसह १२१ धावांवर तर विद्याधर पाटील १ षटकार आणि १ चौकारांसह ३५ धावांवर खेळत होते. उत्तराखंडची गोलंदाजी पूर्णपणे निष्प्रभ ठरली. उत्तराखंडच्या आदित्य रावतने १३२ धावांत ३ तर नेगी, अवनीश सुधा व लक्ष्या रायचंदानी यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला. हा सामना ५ दिवसांचा खेळिवला जात असून आता खेळाचे तीन दिवस बाकी राहिले आहेत.

# मला ती आवडते' १५ वर्षांनी लहान रुचितावरच्या प्रेमाची विशालनं दिली कबुली

**मुंबई :** बिग बॉस मराठी ६ 'मध्ये दिवसेंदिवस नव-नवीन ट्विस्ट येत आहेत. बिग बॉसच्या पाचव्या आठवड्यात करण सोनावणे आणि आयुष संजीव एलिमिनेट झाले. करण सोनावणे एलिमिनेट झाला असल्यामुळे बिग बॉसच्या घरातील एक लव्हस्टोरी अपूर्ण राहिली. करणचं नाव प्राजक्ता शुक्रेसोबत जोडलं जात होतं. करणने बिग बॉसच्या घरात त्याला प्राजक्ताबद्दल वाटणाऱ्या भावना व्यक्त केल्या होत्या. करण आणि प्राजक्तासोबतच बिग बॉसच्या घरात आणखी एक लव्ह अँगल पाहायला मिळत आहे. रुचिता जामदार विशाल कोटियनच्या प्रेमात आहे. अशातच आता कलर्स मराठीनं नुकत्याच शेअर केलेल्या 'बिग बॉस





मराठी ६'च्या प्रोमोमध्ये विशालनेही रुचितावरच्या प्रेमाची कबुली दिली आहे.रुचिता जामदारने बिग बॉसच्या घरात असताना अनुश्रीसोबत बोलताना विशालबद्दलच्या भावना व्यक्त केलेल्या. रुचिता अनुश्रीला म्हणालेली की, 'मला आवडतो त्याचा प्रेझेन्स. पूर्ण घरातले लोक जेव्हा माझ्या चुकांबद्दल बोलत असतात तेव्हा तो माझ्या पॉझिटिव्ह गोष्टींवर बोलतो. मी त्याच्याशी खूप अटॅच्ड आहेःखूप म्हणजे खूप!' अनुश्री याबद्दल विशालला सांगते. विशाल नंतर रुचिताला म्हणतो, 'तू मला का नाही सांगितलंस.' पण अनुश्रीसोबत बोलताना विशाल म्हणालेला की, 'आमच्यामध्ये १५ वर्षांचा फरक आहे, एखादी व्यक्ती अशीच आपल्याला आवडू शकते, तशी मला ती आवडते'कलर्स मराठीनं नुकताच शेअर केलेल्या 'बिग बॉस मराठी ६'च्या प्रोमोमध्ये बिग बॉस नॉमिनेशन टास्क घेतात. या टास्कदरम्यान विशाल दीपालीला नॉमिनेट करतो आणि नॉमिनेट करण्याचं कारण सांगत म्हणतो, 'रुचिता विशालचं ऐकते... ऐकते ती माझं...आता मी सगळ्यांसमोर बोलतो, मला रुचिता आवडते' त्यावर दीपाली म्हणते, 'माझी अपेक्षा ही आहे...बिग बॉसनंतरसुद्धा हे चालू ठेवावं' त्यावर रुचिता म्हणते, 'मला नाही शिकवायचं...माझी आई आहे की, माझा बाप आहे.'प्रोमोवर नेटकऱ्यांनी कमेंट्स करत विशाल आणि रुचिताला ट्रोल केलं आहे. 'अरे म्हाताऱ्या तुझं वय काय तिचं वय काय', 'विशाल तुझा मेंदु काय गुडघ्यात आहे का?', 'रुचिताला बाहेर काढा', 'दीपाली तुझी आई आहे का बाप आहे ते तर माहीत नाही पण तो विशाल तुझा काका आहे', 'रुचिता आणि विशालला बाहेर काढा', 'ती रुचिता मेंदु घरी ठेऊन आली आहे..' अशा कमेंट्स करत नेटकऱ्यांनी रुचिता आणि विशालला ट्रोल केलं आहे.

## रश्मिका विजयच्या लग्नाची कथित पत्रिका व्हायरल! चर्चांना उधाण, यात नक्की काय?

**मुंबई :** दाक्षिणात्य इंडस्ट्रीतील स्टार अभिनेता विजय देवरकोंडा आणि रश्मिका मंदाना अनेक वर्षांपासून एकमेकांना डेट करत असल्याच्या चर्चा होत्या. त्यांच्या लग्नाच्या चर्चाही होत आहेत. फेब्रुवारीमध्ये रश्मिका आणि विजय लग्नबंधनात अडकणार असल्याच्या चर्चा होत्या. अशातच आता त्यांच्या लग्नाची पत्रिकासुद्धा सोशल मीडियावर व्हायरल होतेय. त्यामुळे पुन्हा एकदा रश्मिका आणि विजय चर्चेचा विषय ठरले आहेत.

काही दिवसांपासून विजय आणि रश्मिका २ फेब्रुवारी २०२६ रोजी उदयपूरमध्ये लग्न करणार आहेत,अशा चर्चा होत्या. मात्र, आता रश्मिका आणि विजय यांच्या लग्नाची पत्रिका सोशल मीडियावर व्हायरल होतेय. 'ॅळीरश्रलहरूपळ'ने सोशल मीडियावर व्हायरल होत असलेली रश्मिका आणि विजय यांची पत्रिका शेअर केली आहे. यानुसार, रश्मिका आणि विजय २६ फेब्रुवारी रोजी लग्नाच्या बेडीत अडकणार आहेत. विजय देवरकोंडा आणि रश्मिका मंदाना यांच्या लग्नाची पत्रिका तुफान व्हायरल होत आहे.पत्रिकेमध्ये लिहिल्याप्रमाणे, ४ मार्च रोजी हैदराबादमधील एका भव्य हॉटेलमध्ये विजय आणि रश्मिकाचं रिसेप्शन होणार आहेसोशल मीडियावर पोस्ट व्हायरल होत असली तरी अद्याप या जोडप्याने अधिकृतपणे कोणतीही घोषणा केलेली नाही. विजय आणि रश्मिकाच्या लग्नाच्या चर्चा सुरू झाल्यापासून चाहते खूप आनंदी आहेत. लग्नाच्या या अफवांदरम्यान, विजय आणि रश्मिका अलीकडेच मुंबई विमानतळावर दिसले होते. ते वेगवेगळे आले





असले तरी नंतर एकाच कारमधून निघताना दिसले.रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडा यांनी गेल्या ऑक्टोबरमध्ये हैदराबादमध्ये एका खाजगी समारंभात साखरपुडा उरकल्याच्याही चर्चा झाल्या. सिनेमाच्या प्रमोशनदरम्यान रश्मिकाच्या हातात अंगठी दिसली, त्याचबरोबर तिनं शेअर केलेल्या फोटोंमध्येही अंगठी दिसली, त्यावरून चाहत्यांनी अभिनेत्रीनं विजय देवरकोंडासोबत साखरपुडा उरकल्याचा अंदाज बांधला. मात्र, आता चाहते रश्मिका आणि विजय यांच्या लग्नाबद्दलच्या अधिकृत घोषणेची आतुरतेनं वाट पाहत आहेत.दरम्यान, रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडा यांनी 'गीता गोविंदम', 'डीअर कॉम्रेड' यांसारख्या सिनेमांमध्ये एकत्र काम केलं आहे.

## रोहित शेट्टीच्या घरावर गोळीबार प्रकरणात कारवाई; ६ आरोपींना अटक

**मुंबई :** क्राईम ब्रांचने प्रसिद्ध दिग्दर्शक रोहित शेट्टीच्या घरावर झालेल्या गोळीबार प्रकरणात मोठी कारवाई करत आणखी सहा आरोपींना अटक केली आहे. राजस्थानमधील बहादूरगड येथून ही कारवाई करण्यात आली असून, मुंबई क्राईम ब्रांच आणि बहादूरगड स्पेशल टास्क फोर्स यांच्या संयुक्त पथकाने ही धडक कारवाई केली.

या कारवाईत हरियाणामधून चार तर उत्तर प्रदेशमधून दोन असे एकूण सहा आरोपी ताब्यात घेण्यात आले आहेत. अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून मोबाईल फोनसह गुन्ह्याशी संबंधित काही महत्त्वाचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. तपासादरम्यान या आरोपींचा गोळीबाराच्या कटात नेमका सहभाग काय होता, याचा सखोल तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या सहाही आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने त्यांना २५ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिस



कोठडीत आरोपींची कसून चौकशी करून या प्रकरणामागील संपूर्ण नेटवर्क उघड करण्याचा प्रयत्न सुरू आहे. या प्रकरणात यापूर्वी पुण्यातून पाच आरोपींना अटक करण्यात आली होती. त्या आरोपींनाही न्यायालयाने १७ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पुण्यात अटक केलेल्या आरोपींकडून मिळालेल्या माहितीच्या आधारेच राजस्थान, हरियाणा आणि उत्तर प्रदेशातील आरोपींपर्यंत पोलिसांना पोहोचता आले, अशी माहिती सूत्रांनी दिली.

## अमिषा पटेल अडचणीत ; फसवणूक प्रकरणी अजामीनपात्र वॉरंट

**मुंबई :** बॉलिवूड अभिनेता राजपाल यादवला चेक बाउन्स प्रकरणात तिहार तुरुंगातून जामीन मिळाला आहे. अशात आता बॉलिवूड अभिनेत्री अमीषा पटेलच्या अडचणी वाढल्या आहेत. अमीषा पटेल विरोधात अजामीनपात्र वॉरंट दाखल झाले आहे. यामुळे सोशल मीडियावर खळबळ उडाली आहे.

१० वर्षांपूर्वी मुरादाबाद येथील एका कार्यक्रमामुळे अमीषा पटेलच्या विरोधात वॉरंट दाखल झाले होते. आता त्याच संबंधित १६ फेब्रुवारी रोजी एसीजेएम-५ च्या कोर्टकडून अमीषा पटेलच्या विरोधात अजामीनपात्र वॉरंट दाखल करण्यात आले. कोर्टाकडून दिलेल्या तारखेला हजर न राहिल्याने तिला हे समन्स देण्यात आले आहे. आता कोर्टात हजर राहण्यासाठी अमीषा पटेलला नवीन तारीख देण्यात आली आहे. अमीषा पटेलला आता २७ मार्चला कोर्टात हजर राहायचे आहे. मुरादाबाद इथल्या 'ड्रीम व्हिजन' इव्हेंट कंपनीचे मालक पवन कुमार वर्मा यांनी अमिषा पटेल





विरोधात तक्रार दाखल केली. पवन कुमार यांनी पैसे मागितल्यावर अमिषाने अर्धी रक्कम परत केली. बाकी रकमेसाठी तिने चेक दिला. मात्र तो बाउन्स झाला.

१० वर्षांपूर्वी एका इव्हेंट कंपनीने अमीषा विरुद्ध तक्रार केली होती की, अमीषा पटेलने २०१७ ला एका लग्नात परफॉर्मन्स करण्यासाठी तब्बल ११ लाख रुपये घेतले होते. मात्र पैसे देऊनही तिने कार्यक्रम केला नाही. परफॉर्मन्स करण्यासाठी अमीषा मुंबईहून दिल्लीला गेली होती. तेव्हा तिने ठरवलेल्या रक्कमेत आणखी दोन लाख रुपये वाढवून मागितले मात्र इव्हेंट कंपनीने ते देण्यास नकार दिला, त्यामुळे अमीषा परफॉर्मन्स न करता मुंबईला परतली. त्यामुळे कंपनीचे मालक पवन वर्मा यांनी अमीषाविरोधात तक्रार दाखल केली आहे.

आता या प्रकरणाची पोलीस चौकशी करत आहे. अमीषा पटेल विरोधात मुरादाबाद न्यायालयात खटला सुरू आहे. तिच्यावर भारतीय दंड संहितेचे कलम १२०-बी, ४०६,५०४ आणि ५०६ लावण्यात आले आहे. दोन वर्षांपूर्वी या प्रकरणात अमीषा पटेलला जामीन मिळाला होता. मात्र तिने अटींचे पालन न केल्यामुळे अमीषा पटेल विरोधात अजामीनपात्र वॉरंट दाखल झाले आहे.

# जिल्हा परिषदेत शिव जयंती सोहळा शाहिरी जागर

## राष्ट्रमाता जिजाऊ व बाल शिवबाच्या शिल्पाचा अनावरण समारंभ

**जनसंचलन/बुलढाणा**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंती पर्वावर बुलढाणा जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारी राष्ट्रमाता जिजाऊ व बाल शिवबा यांच्या शिल्पाचे अनावरण करण्यात येणार आहे. बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद जाधव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हा शिल्प अनावरण सोहळा केंद्रीय मंत्री ना. प्रतापराव जाधव व ना. रक्षाताई खडसे यांच्या हस्ते पार पडणार आहे. या शिल्प अनावरण समारंभास सहपालक मंत्री ना. संजय सावकारे, कामगार मंत्री ना. अ‍ॅड. आकाश फुंडकर , विधान परिषद सदस्य सर्वश्री किरण सरनाईक, वसंत खंडेलवाल, धीरज लिंगाडे तसेच विधानसभा सदस्य सर्वश्री चैनसुख संचेती, डॉ. संजय कुटे, संजय गायकवाड,श्वेताताई महाले, सिद्धार्थ खरात, मनोज कायंदे, ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, अमरावती विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, शिल्पकार प्रमोद कांबळे , अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन, प्रकल्प संचालक पांडुरंग कोल्हे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रकाश राठोड यांच्यासह विविध खातेप्रमुख प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. यापूर्वी जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारी राष्ट्रमाता जिजाऊंची प्रतिमा स्थापित करण्यात आलेली होती. आता त्या ठिकाणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या संकल्पनेतून राष्ट्रमाता जिजाऊ व बाल शिवबा यांच्या शिल्पाची स्थापना केल्या



जाणार आहे. या निमित्ताने शाहीर विक्रांतसिंग राजपूत यांचा शाहिरी जागर कार्यक्रम सुद्धा आयोजित करण्यात आला आहे. शिव जयंतीच्या औचित्यावर आयोजित या शिल्प अनावरण सोहळ्यास सर्व शिवप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार, प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील व बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सुशील गुडधे यांनी केले आहे.

# सुलतानपूरमध्ये पत्रकाराची दुचाकी लंपास; चोरट्यांचा हैदोस सुरूच!

**जनसंचलन/बुलढाणा**

शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, चक्क एका पत्रकाराची दुचाकी चोरट्यांनी घरफोडीच्या स्टाईलने लंपास केल्याची घटना घडली आहे. सुलतानपूर येथील रहिवासी आणि पत्रकार मोईन खान मन्नान खान पठाण यांची दुचाकी आज पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरट्याने पळवून नेली. नेमकी घटना काय? मिळालेल्या माहितीनुसार, मोईन खान यांनी आपली दुचाकी (क्रमांक: २८ ९२८४) नेहमीप्रमाणे आपल्या घरासमोर उभी केली होती. बुधवार, दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे ३ ते ४ वाजेच्या दरम्यान चोरट्यांनी संधी साधून ही दुचाकी लंपास केली. सकाळी जेव्हा ही बाब लक्षात आली, तेव्हा परिसरात एकच खळबळ उडाली. पोलीस प्रशासनासमोर आव्हान सुलतानपूर परिसरात गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून, आता थेट पत्रकाराचीच गाडी चोरीला गेल्याने सामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घरासमोरून गाडी चोरीला जाणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. या संदर्भात पोलीस प्रशासनाने तातडीने तपास करून चोरट्यांचा बंदोबस्त करावा आणि माझी दुचाकी शोधून द्यावी. मोईन खान पठाण (पीडित पत्रकार) या प्रकरणाची तक्रार पोलीस स्थानकात दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा शोध घेण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# आरटीई २५ टक्के अंतर्गत विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज 10 मार्चपर्यंत करावेत




**जनसंचलन/बुलढाणा**

वंचित व दुर्बल घटकांतील मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाची आरटीई () २५ टक्के प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पालकांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी दि. १० मार्च २०२६ या कालावधीत मुदत देण्यात आली आहे. बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम १२ (१) () नुसार खाजगी विना अनुदानीत, कायम विना अनुदानीत तसेच स्वयंअर्थ सहाय्यीत शाळांमध्ये प्रवेश स्तरावर २५ टक्के जागा वंचित व दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद आहे. या तरतुदीनुसार प्रवेश प्रक्रियेअंतर्गत पालकांना ऑनलाईन अर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रवेश प्रक्रियेसाठी शासन स्तरावरून सुधारित सूचना निर्गमित करण्यात आल्या असून, पालकांनी संबंधित अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन सुधारित नियम, पात्रता निकष, आवश्यक कागदपत्रे व संपूर्ण प्रक्रियेची माहिती घ्यावी, असे आवाहन शिक्षणाधिकारी(प्राथमिक) यांनी केले आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र बालकांनी या प्रक्रियेत सहभाग नोंदवावा व पालकांनी आपल्या पाल्याचा अर्ज विहित मुदतीत भरावा, असे आवाहन शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद बुलढाणा यांच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच जिल्ह्यातील शाळा, तालुकास्तर कार्यालये व शिक्षण क्षेत्रातील संस्थांनी आपल्या स्तरावरून या प्रवेश प्रक्रियेची व्यापक प्रसिद्धी करून अधिकाधिक विद्यार्थ्यांचा समावेश करण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# जळगाव जामोदच्या शेठ तुळशीराम ढोकणे विद्यालयाचा धक्कादायक कारनामा



**जनसंचलन/ जळगाव जामोद**

तालुक्यातील आसलगाव येथील शेठ तुळशीराम ढोकणे विद्यालय येथे घडलेला धक्कादायक प्रकार समोर आला असून, शाळेतील विद्यार्थ्यांचा जीव अक्षरशः धोक्यात घालण्यात आल्याचा संतापजनक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये मालवाहक गाडीत डेक्स बेंच भरलेले दिसत असून, त्या बेंचला धरून काही विद्यार्थी उभे राहून प्रवास करत असल्याचे स्पष्टपणे दिसते. हा प्रकार अत्यंत जीवघेणा असून, थोडीशी चूक झाली असती तर मोठी दुर्घटना घडली असती, अशी भीती व्यक्त केली जात आहे. संबंधित विद्यार्थी डेक्स बेंच गावातील जिल्हा परिषद हायस्कूल आसलगाव येथे घेऊन जात होते, अशी माहिती समोर येत आहे. शाळेच्या प्रशासनाने मालवाहू वाहनातून साहित्य नेण्यासाठी शिपाई किंवा मजुरांची मदत घेणे अपेक्षित असताना विद्यार्थ्यांकडूनच हे काम करून घेतल्याचा आरोप होत आहे. शिक्षण मंदिरात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य असणे गरजेचे असताना अशी बेफिकिरी का? असा सवाल पालकांकडून उपस्थित केला जात आहे. हा प्रकार केवळ निष्काळजीपणाच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ असल्याची टीका होत आहे. संबंधित जबाबदारांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, तसेच अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी शिक्षण विभागाने कडक निर्देश द्यावेत, अशी मागणी जोर धरत आहे. दरम्यान, प्रशासन या प्रकरणाची दखल घेणार का? की व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतरही कारवाईचा फक्त दिखावा होणार? असा संतप्त सवाल आता सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलढाणा जिल्ह्यात मका खरेदीचे उद्दिष्ट वाढवून केंद्रे त्वरित सुरू करा

## उ.बा.ठा शिवसेना प्रवक्ता जयश्रीताई शेळके यांची मंत्र्यांसह मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात मक्याचे विक्रमी उत्पादन झाले असताना नाफेडकडून केली जाणारी खरेदी मर्यादा अत्यंत तुटपुंजी आहे. उद्दिष्ट संपल्याच्या कारणावरून जिल्ह्यातील अनेक मका खरेदी केंद्रे बंद करण्यात आली असून, यामुळे हजारो शेतकरी अडचणीत सापडले आहेत. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेता, मका खरेदीचे उद्दिष्ट तातडीने वाढवून सर्व केंद्रे पूर्ववत सुरू करावीत, अशी आग्रही मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या प्रवक्त्या ॲड. जयश्री शेळके यांनी पणन मंत्र्यांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पाठवलेल्या निवेदनातून केली आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, बुलढाणा जिल्ह्यात २०२५-२६ च्या खरीप हंगामात एकूण ५२,८५५.७ हेक्टर क्षेत्रावर मका लागवड करण्यात आली आहे. नाफेडच्या निकषानुसार हेक्टरी ३९ क्विंटल उत्पादन गृहीत धरल्यास जिल्ह्यात अंदाजे २०,६१,३७२ क्विंटल मका उत्पादन अपेक्षित आहे. मात्र, जिल्ह्यासाठी प्रत्यक्षात केवळ ६०,००० क्विंटल इतकेच खरेदी उद्दिष्ट देण्यात आले आहे, जे एकूण उत्पादनाच्या तुलनेत अत्यंत नगण्य आहे. जिल्ह्यातील सुमारे ५,७०० शेतकऱ्यांनी नाफेडकडे मका खरेदीसाठी रीतसर नोंदणी केलेली असतानाही, उद्दिष्ट पूर्ण झाले असे कारण पुढे करून अनेक खरेदी केंद्रांवरील व्यवहार बंद ठेवण्यात आले आहेत. मका खरेदी बंद असल्याने शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणात माल शिल्लक आहे. याचा गैरफायदा खासगी व्यापारी घेत असून बाजारभाव पाडले जात आहेत. परिणामी शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान होत असून त्यांच्यामध्ये सरकारविरोधात तीव्र रोष निर्माण झाला आहे. एकीकडे शासन हमीभावाच्या गप्पा मारते आणि दुसरीकडे प्रत्यक्षात खरेदी बंद करून शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जाते, हे अन्यायकारक



आहे, अशी भूमिका ॲड. जयश्री शेळके यांनी मांडली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील अपेक्षित मका उत्पादनाच्या प्रमाणात नाफेडचे खरेदी उद्दिष्ट तातडीने वाढवून द्यावे, बंद असलेली सर्व खरेदी केंद्रे त्वरित सुरू करावीत आणि नोंदणीकृत प्रत्येक शेतकऱ्याचा मका हमीभावाने खरेदी केला जाईल याची खात्री करावी. तसेच शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा अशी विनंती या निवेदनात करण्यात आली आहे

# सहकारातील कार्यकर्ता गौरवाचा क्षण- राध्येश्यामजी चांडक



**जनसंचलन/बुलडाणा**

बुलडाणा जिल्हा पतसंस्था फेडरेशनच्या सभेमध्ये चिखली शहराचे नवनियुक्त नगराध्यक्ष पंडीतराव देशमुख यांचा हृदय सत्कार करण्यात आला. सहकार क्षेत्रातील कार्यकर्ता आपल्या कामाच्या भरवश्यावर नगराध्यक्ष निवडणुकीत उभा राहतो व निवडुण येतो ही सहकारात काम करणा-या संचालक, अध्यक्षांना प्रेरणा दायी बाब आहे.श्रीराम नागरी पतसंस्था सुरू करून अध्यक्षांचा कार्यभार सांभाळत असतांना जिजाऊ कॉन्व्हेंट, शाळा, जुन्या गावातील स्माशानभुमी संवर्धन, सुशोभीकरण, संस्थेची सुसज्ज इमारत शेतकी संस्थेमध्ये नौकरी, कोणताही राजकीय वरसा नसणारे समान्य कुटुंबात जन्म परंतु गेल्या ३०-३५ वर्षात राजकारण-समाजकरण सर्व सामान्यांशी जिव्हाळयाचे संबध निर्माण करून तिन ते चार वेळा नगरसेवक, भाजपा नगराध्यक्ष आणि आता चिखली भारतीय जनता पार्टी चे नगर परिषद अध्यक्ष, ते सध्या बुलडाणा जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे संचालक आहेत.त्यांचा सत्कार फेडरेशनचे अध्यक्ष राध्येश्याम चांडक उपाख्य भाईजी, मानद सचिव सुरेंद्र पांडे, उपाध्यक्षा स्वातीताई वाकेकर, संचालक मखनलालजी मुंदडा, दिपक देशमाने, सौ. स्वातीताई कनेर, सतिष कायंदे, गोविंद मापारी, बबनराव गि-हे, या सर्वांच्या उपस्थितीत करण्यात आला. त्यांच्या कडून चिखली शहराचा सर्वांगीण विकास व्हावा आशा शुभेच्छा देण्यात आल्या.

# २५ फेब्रुवारीला शेगावात आयुष आरोग्य महामेळावा.!

**जनसंचलन/शेगाव**

संत नगरी शेगाव येथे २५ फेब्रुवारीपासून भव्य आयुष आरोग्य महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या महामेळाव्यात शेतकऱ्यांसाठी वन शेती ,औषधी वनस्पती संदर्भात तज्ञ मार्गदर्शन करणार आहे .आयुर्वेद शेती उत्पादन कार्यक्रमात शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी आवाहन केले आहे . २५ ते २७ फेब्रुवारीपर्यंत संत नगरी शेगाव येथील विसावा परिसरात आयुष मंत्रालयाच्या वतीने आयुष आरोग्य महामेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे. या मेळाव्याचे उद्घाटन २५ फेब्रुवारीला राष्ट्रपती द्रोपती मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे त्यानंतर दुपारी ३ वाजता शेतकरी बांधवांसाठी आयुर्वेदिक शेती उत्पादन आणि विक्री मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे या महामेळाव्यात विशेषत:शेतकऱ्यांसाठी वन औषधी शेती, प्रक्रिया आणि विपणन यावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळणार आहे. पारंपारिक पद्धतीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना आयुर्वेदिक शेतीची जोड मिळावी तर शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा होईल या उद्देशाने केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांच्या संकल्पनेतून या आयुष आरोग्य महामेळाव्यामध्ये आयुर्वेदिक शेती व उत्पादन विक्री , प्रक्रिया आणि विपणन यावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आहे यामध्ये नॅशनल मेडिसिनल प्लांट बोर्ड, नवी दिल्लीचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रोफेसर (डॉ.) महेश कुमार दाधीच आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत असलेल्या नागार्जुन वन औषधी प्रकल्पाचे प्रभारी अधिकारी डॉ. नितीन पतके हे उपस्थित राहून शेतकऱ्यांना माहिती देणार आहे.

# कायस्थ कॅटर्सची दणक्यात कामगिरी जिल्हा परिषदेकडून जाहीर सत्कार!

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा जिल्हा परिषद तर्फे आयोजित विभागीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सव सन २०२६ या भव्य कार्यक्रमात कायस्थ कॅटर्सने आपल्या उत्कृष्ट नियोजन व व्यवस्थापन कौशल्याची जोरदार छाप पाडली. हजारो विद्यार्थी, शिक्षक आणि मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या बहुप्रतीक्षित सोहळ्यात भोजन व्यवस्था, स्टेज डेकोरेशन, आसनव्यवस्था आणि इव्हेंट मॅनेजमेंटची संपूर्ण जबाबदारी कायस्थ कॅटर्सने समर्थपणे सांभाळली. कार्यक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल जिल्हा परिषदेचे सीईओ श्री. खरात यांच्या हस्ते कायस्थ कॅटर्सचा विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनीही त्यांच्या कामाचे तोंडभरून कौतुक केले. काटेकोर नियोजन, वेळेचे भान आणि दर्जेदार सेवा यामुळे संपूर्ण कार्यक्रम सुरळीत पार पडला. आमच्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल बुलढाणा जिल्हा परिषदेचे सर्व अधिकारी, कर्मचारी आणि आयोजन समितीचे मन:पूर्वक आभार, अशी प्रतिक्रिया कायस्थ




कॅटर्सच्या वतीने व्यक्त करण्यात आली. या यशामुळे कायस्थ कॅटर्सची जिल्ह्यातील विश्वासार्ह आणि आघाडीची इव्हेंट व्यवस्थापन संस्था म्हणून ओळख अधिक भक्कम झाली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८